आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव
राष्ट्रीय आरोग्य अभियान

## थेट मुलाखत (Walk in Interview)
## पदाचे नाव :- योग शिक्षक (योग सत्रनिहाय)

राष्ट्रीय आरोग्य अभियान,आरोग्य विभाग जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत जिल्हयातील आरोग्यवर्धिनी केंद्र १)चिलवडी तालुका धाराशिव २)होर्टी तालुका तुळजापूर ३) उळुप तालुका भुम ४) डोंजा तालुका परंडा ५) मस्सा (खं) तालुका कहंब ६) ताकविकी तालुका धाराशिव या ठिकाणी योग सत्र घेण्यासाठी योग शिक्षक यांची निवड करणेसाठी थेट मुलाखत दि.12/10/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते दु.०५.०० या वेळेत आयोजीत करण्यात आली आहे. तरी इच्छुक योग शिक्षकांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह मुलाखतीस वेळेवर उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी व मार्गदर्शक सुचनांसाठी **www.osmanabad.gov.in** वेळे व **www.zposmanabad.gov.in** या संकतेस्थळावरुन माहिति घ्यावी.

**आवश्यक कागदपत्र:-** अर्ज, सर्व शैक्षणिक कागदपत्र ,मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदविका प्रमाणपत्र, असल्यास अनुभव प्रमाणपत्र सदरील उमेदवार हा आरोग्य वर्धिनीकेंद्रच्या गावामधील किंवा त्याच तालुक्यातील रहिवाशी असवा.

**मुलाखत /कागदपत्र पडताळणीचे ठिकाण :-** राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रुम नं.२१८, दुसरा मजला जिल्हा परिषद धाराशिव फोन:- ०२४७२-२२१६१३

-स्वाक्षरीत-
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव

- स्वाक्षरीत-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव

# राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद धाराशिव
# योग शिक्षक (योग सत्रनिहाय) या पदाची
# थेट मुलाखतसन २०२३-२४

आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील आरोग्यवर्धिनी केंद्रया ठिकाणी साप्ताहीक योग सत्र घेण्यासाठी योग शिक्षक यांची निवड करणेसाठी थेट मुलाखत दि.१२/१०/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते दु.०५.०० या वेळेत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रुम नं.२१८, दुसरा मजला जिल्हा परिषद धाराशिव येथे आयोजीत करण्यात आली आहे. योग शिक्षकांची खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निवड करण्यात येणार आहे.

<u>अटी व शर्ती :-</u>

१. आयुष आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वैद्यकिय अधिकारी यांनी तयार केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे महिनाभरामध्ये कमीत कमी एक तासेचे ३२ योगसत्र आयोजीत करण्यात यावेत.

२. ३२ योगसत्रांपैकी २० योगसत्र आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये व उर्वरित १२ योगसत्र कार्यक्षेत्रामध्ये (शाळा,आश्रमशाळा, महाविद्यालये,ग्रामपंचायत,महिला बचतगट, जेष्ठनागरिक संघ व इतर शासकिय/निमशासकिय संस्था) घेण्यात यावीत.

३. ३२ योगसत्रापैकी कार्यक्षेत्रामध्ये कमीत कमी एक तासाचे व (IEC) स्वरुपाचे उपक्रम राबविण्यात यावेत.

४. योग विषयामध्ये आशा,आरोग्य सेविका,आरोग्य सेवक व इतर कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन क्षमता वृध्दी करण्यात यावी.

५. वैद्यकिय अधिकारी,आशा,आरोग्य सेविका,आरोग्य सेवक यांना जनजागृती मोहिम आयोजित करण्यामध्ये मदत करणे

६. योग विषयक दस्तऐवज नियमितपणे तयार करुन मासिक अहवाल सादरीकरणामध्ये मदत करणे. तसेच आशा आरोग्य सेविका यांना कार्यक्षेत्रामध्ये योग विषयक उपक्रमामध्ये देखरेख करण्यास मदत करणे

७. वर्षभरात कार्यक्षेत्रामध्ये समुदाय स्तरावर कमीत कमी दोन योग विषयक जनजागृती मोहिम मोठया प्रमाणावर आयोजित करण्यात यावी.

८. योग सत्राकरिता मोठया संख्येने नागरिक उपस्थीत राहतील याची दक्षता घ्यावी.

९. आयुष आरोग्य वर्धिनी केंद्रांसाठी निवड केलेल्या योग प्रशिक्षक (अर्धवेळे) (पुरुष/स्त्री) यांना रु.८०००/- प्रतिमाह मानधन देय असुन त्यांनी रु.२५०/- प्रतितास याप्रमाणे कमीत कमी ३२ तास/प्रतिमाह योगसत्र आयोजित करावयाची आहेत.

आवश्यक कागदपत्र :-

१. अर्ज

२. सर्व शैक्षणिक कागदपत्र

३. मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदविका उत्तीर्ण झालेबाबतचे प्रमाणपत्र

४. अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)

<u>मुलाखत /कागदपत्र पडताळणीचे ठिकाण :-</u>

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय रुम नं.२१८, दुसरा मजला जिल्हा परिषद धाराशिव

फोनः- ०२४७२-२२१६१३

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद धाराशिव

DAO